स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्र शाखे अंतर्गत इतिहास विषयात पीएच.डी पदवीसाठी

सादर करण्यात येणाऱ्या संशोधन प्रकल्पाचा आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमातीचा, सांस्कृतीक व आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास

संशोधक

प्रा.देविदास नागोराव रिठे

श्री.शिवाजी महाविद्यालय, परभणी

मार्गदर्शक

प्रो.डॉ.पी.ए.सुतवणे

इतिहास विभाग प्रमुख

श्री.शिवाजी महाविद्यालय,परभणी

सन २०१९-१९

यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमातीचा सामाजिक, सांस्कृतीक व आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास

प्रस्तावाना :-

भारत हा विविधतेने नटलेला देश आसून भारतातील विविध प्रांतातील लोकांची भाषा, धर्म, संस्कृती, चालिरीती, रुंढी, परपंरा यांच्यात विविधता दिसुन येते. तसेच भारतीय समाज विविध जाती, जमाती मध्ये विभागलेला आहे. भारतात जवळपास ६ हजारापेक्षा जास्त जाती व उपजाती आहेत. प्राचिन काळापासून भारतात वास्तव्य करणाऱ्या अनेक आदिवासी जमाती देशाच्या विविध प्रांतात राहत असलेल्या दिसून येतात.

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात आदिवासींची लोकसंख्या १०.४५ कोटी असून ती एकुण लोकसंख्येच्या ८.६३ टक्के इतकी आहे. महाराष्ट्रात २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासी जमातीची लोकसंख्या १ कोटी ५ लाख १० हजार २१३ इतकी असुन त्यांची टक्केवारी ९.३५ इतकी आहे. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्यात आंध, गौंड, कोलाम, परधान, पारधी या आदिवासी जमाती राहतात. या आदिवासी जमातींची सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक, आर्थिक वैशिष्ट्ये अलग अलग असुन प्रत्येक जमातीचे सामाजिक जीवन हे त्यांच्या भोवतालच्या भौगोलिक व परंपरागत चालत आलेल्या जीवनदृष्टीने बनलेले आहे. तसे असले तरी सर्वसामान्य आदिवासींचे जीवन त्यांचे मुल्ये यांच्यात सारखेपणा आढळतो. आदिवासी समाज हा भोळाभाबडा, प्रामाणिक, दैववादी, परंपरागत जीवनदृष्टीचा निसर्गाच्या सान्निध्यात रमणारा जीवनाचा स्वच्छांदपणे आनंद लुटणारा आहे. तो जंगल, दऱ्या खोऱ्यात, कडा कपाऱ्यात राहणारा असला तरी त्याची राहणी त्याच्या निर्मळ मनासारखी साधी व स्वच्छ आहे. त्याची जीवनाकडे बघण्याची स्वतंत्र व वेगळी दृष्टी आहे. जमीन, गुरे, ढोरे, बकऱ्या, कोंबड्या, मासे, खेडके आणि शेतात राबण्यासाठी मजबुत हातपाय हीच त्याची परंपरागत संपत्ती आहे. आदिवासींची शेती खेरीज दुसरा धंदा म्हणजे जंगलातील वस्तु गोळा करणे. त्यामध्ये मध, डिंक, तेंदुची पाने, मोहाची फुले, जंगली फळे व औषधी गोळा करणे इत्यादी आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी जमाती ह्या प्राचिन काळापासून तेथे वास्तव्य करतात. तरी ह्या जमाती यवतमाळ जिल्हा शिवाय आजुबाजुंच्या नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा जिल्ह्यातही आढळतात. यवतमाळ जिल्ह्यावर प्राचिन काळापासून अनेक राजवटींनी राज्य केले परंतु तेथे वासतव्यास असणाऱ्या आदिवासी जमातीच्या जीवन शैलीत किंवा सांस्कृतिक कोणताही बदल झाला नाही. मात्र यवतमाळ जिल्हा ब्रिटीशांच्या ताब्यात गेल्यानंतर ब्रिटिश वसाहतवादाचे परिणाम आदिवासी समाजालाही भोगावे लागले. त्यांचे वसतीस्थान असलेली जंगले ब्रिटिशांनी वेगवेगळ्या जंगल

कायद्यानुसार आपल्या ताब्यात घ्यायला सुरुवात केली व आदिवासींना त्यांच्या नैसर्गिक अधिकारापासून वंचीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हळुहळु आदिवासी समाज हा वसाहतवादाच्या विळख्यात आडकला. त्याचे अनेक दुष्परिणाम आदिवासी समाजावर झाले. पुढे इ.स. १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मागील सत्तर वर्षात भारत सरकारने आदिवासी समाजासाठी विकासाच्या अनेक योजना राबविल्या. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या प्रयत्न केला. परंतु आजही बहुतेक आदिवासी हे लहान शेतकरी असुन त्यांच्याकडे अगदीच तुटपुंजी जमीन आहे. ती ही माळाच्या काठावर असलेली दिसते. तर काही आदिवासी हे शेतमजुर आहेत. आदिवासी समाजाला शेतीचे आधुनिक ज्ञान अवगत नसल्याने ते जुनाट पध्दतीने शेती करतात. उत्पादन कमी होत असल्याने हा समाज कर्जबाजारी झाला व पिढ्यान पिढ्या कसत असलेल्या जमीनी पासुन तो वंचीत होत आहे. तर इतर समाज हा आदिवासी लोकांच्या प्रामणिकपणाचा व साधेपणाचा गैर फायदा घेताना दिसतो. हा समाज शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला असल्याने आदिवासी व बिगर आदिवासी यांच्यामध्ये समान पातळीवर सुसंवाद होऊ शकत नाही. आदिवासींना संघटीत करण्यासाठी थोडेबहुत प्रयत्न करण्यात आले. परंतु त्यामध्ये सुसुत्राता नसल्याने त्यांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने संघटीत चळवळ उभी राहु शकली नाही म्हणुन आदिवासी समाजांच्या प्रश्नाचा सर्वांगीण अभ्यास करणे गरजेचे आहे.

संशोधन विषयाची निवड :-

सर्वसाधारणपणे आदिवासींचे जीवन त्यांचा पुर्व इतिहास व संस्कृती यांच्या अभ्यासाचे क्षेत्र अत्यंत व्यापक आहे. पण त्या मानाने अभ्यासाची साधने फारच मर्यादित आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासींच्या बाबतीत तर ही उणीव प्रकर्षाने जाणवते.

यवतमाळ जिल्ह्यात आंध, गोंड, कोलाम, परधान, पारधी या प्रमुख जमाती आहेत. त्यातील आंध जमात ही महाराष्ट्राशिवाय तेलंगना, मध्यप्रदेशात, आंध्रप्रदेशात वास्तव्य करत असल्याचे दिसून येते परंतु महाराष्ट्रामध्ये त्यांची संख्या अधिक आहे. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्ह्याशिवाय नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा वाशीम या जिल्ह्यातही आढळते. आंध जमात ही विदर्भ व मराठवाड्यातील बऱ्याच भुभागावर वास्तव्य करत असलेली दिसते. संशोधनाच्या दृष्टीने एवढ्या मोठ्या भुभागावर वास्तव्य करणाऱ्या जमाती बद्दल संशोधन करत असताना त्याला पूर्ण न्याय देता येणार नाही म्हणुन मी यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमातीचाच अभ्यास करणार आहे.

मागील सत्तर वर्षात भारत सरकारने आदिवासी विकासांच्या अनेक योजना राबविल्या. त्याचा परिणाम म्हणुन आदिवासी समाज हा शिक्षण, आरोग्य, अर्थ, पाणी या बाबतीत हळुहळु जागरुक होऊ

लागला आहे. परंतु आजही यवतमाळ जिल्ह्यातील आंध या जमातीचा अनेक समस्यांना तोंडा द्यावे लागत आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य, पाणी, शेती या बद्दल त्यांच्या अनेक समस्या आहेत. त्याचा परिणाम त्यांच्या जीवनावर होताना दिसतो. आजही बिगर आदिवासी जाती ह्या आदिवासी असल्याचे खोटे दावे करुन आदिवासींच्या सवलतींचा पुरेपुर फायदा घेत आहे. व मुळ आदिवासींना त्यांच्या हक्कापासुन वंचीत करत आहेत. शासन पातळीवरही त्यासाठी काही ठोस पावले उचलताना दिसुन येत नाहीत.

यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमातीमध्ये प्राचीन काळापासून ते आजपर्यंत जे काही परिवर्तन झाले व आज त्यांना ज्या काही समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्या दूर करण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी कोणते प्रयत्न करावे लागतील यासाठी मी हा विषय निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१. यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमातीचा इतिहास अभ्यासणे.

२. यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमातीच्या सामाजिक, सांस्कृतीक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

३. यवतमाळ जिल्ह्यातील आंध समाजात घडुन आलेल्या सामाजिक, सांस्कृतीक व आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.

४. सध्याच्या स्थितीतील आंध जमातीतील समस्या व त्यावरील उपयायोजनांचा अभ्यास करणे.

गृहितकृत्ये :-

१. यवतमाळ जिल्ह्यात प्राचिन काळापासुन आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे.

२. यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमाती ह्या आपला सांस्कृतीक वारसा जपुन आहेत.

३. यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमातीच्या सामाजिक, सांस्कृतीक व आर्थिक क्षेत्रात परिवर्तन घडुन आले.

४. आजही आंध जमातीला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्याचा परिणाम त्यांच्या सामाजिक सांस्कृतीक व आर्थिक स्थितीवर होतांना दिसत आहे.

संशोधनाची व्याप्ती :-

महाराष्ट्रात एकुण ४७ आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यात आदिवासी लोकांची वस्ती दाट असली तरी ते सर्वच जिल्हात वसलेले आहेत. त्यांचे जीवन, त्यांचा इतिहास व संस्कृती यांच्या अभ्यासाची क्षेत्रे अत्यंत व्यापक आहेत पण त्या मानाने अभ्यासाची साधने फारच मर्यादित आहेत म्हणुन माझ्या संशोधनाची व्याप्ती ही यवतमाळ जिल्ह्यापुरतीच मर्यादित आहे. यवतमाळ जिल्ह्यातील जवळपास उमरखेड, पुसद, दिग्रस, आर्णी, महागांव या तालुक्यात आंध जमातींची लोकसंख्या जास्त असलेली दिसुन येते. या तालुक्यात अनेक गावेही आंध जमातीची आहेत विशेष:त पैनगंगा अभयारण्यात आंध जमातीची खेडी जास्त दिसून येते. अंधाची बरीचशी गावे ही बंदी भागात असल्यामुळे संशोधनाला मर्यादा पडतात. मला यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमातीमध्ये झालेल्या परिवर्तनाचाअभ्यास करावयाचाआहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन अध्ययनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेण्यात येणार आहे. प्राथमिक साधनात प्रश्नावली, मुलाखती, सर्वेक्षण, नमुना निवड यांचा समावेश होतो. तर दुय्यम साधनात संदर्भ ग्रंथे, माहिती पुस्तके, सरकारने आदिवासी उपाय योजना संदर्भात प्रसिध्द केलेली पुस्तके, माहिती, नियतकालिके इतर संशोधन लेख, जणगणना अहवाल यांच्या आधारे विश्लेषनात्मक, ऐतिहासीक, वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा :-

* डॉ.गोविंद गारे यांनी आंध समाजावर पहिला ग्रंथ २००१ मध्ये प्रकाशित केला. तो म्हणजे "पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध आदिवासी " हा होय. यामध्ये डॉ.गारे गोविंद, यांनी आंध समाजाच्या प्राचिन इतिहासाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. तसेच त्यांचे सामाजिक व सांस्कृतीक जीवनाचा आढावा घेतला आहे.

* डॉ.चवरे रा.गो.यांनी यवतमाळ जिल्ह्यातील साहित्य आणि संस्कृती यावर माहिती संकलीत करुन "आंध जमात : साहित्य आणि संस्कृती" नावाचा ग्रंथ २०१० मध्ये प्रकाशित केला आहे. त्यामधुन यवतमाळ जिल्ह्यातील आंधाचे लोकसाहित्य व संस्कृती यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

* प्रा.डॉ. धनजकर राजेश यांनी मराठवाड्यातील "आंध जमाती लोकसाहित्य चिकित्सक अभ्यास" या विषयावर त्यांना २०१२ साली पीएच.डी. प्रदान झाली. या प्रबंधामध्ये प्रा.डॉ. धनजकर

त्यांनी मराठवाड्यातील आंध जमातीचे सामाजिक, सांस्कृतीक, आर्थिकृ धार्मिक, शैक्षणिक जीवनावर प्रकाश टाकला आहे.

* प्रा. डॉ. कोटुरवाड दिपक यांनी यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी जमातीच्या समस्या, उपाय व शासकीय योजनांचे त्यांच्या विकास प्रक्रियेतील योगदानांचे विश्लेषणात्मक अध्ययन या विषयावर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातुन २००८ मध्ये पीएच.डी प्राप्त केली आहे. त्यांनी यामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील सर्व आदिवासी जमातींच्या समस्या व उपाय यावर संशोधन केले आहे.

* भिसे तुकाराम, उपसंचालक, वित्त व लेखा विभाग महाराष्ट्र शासन यांनी २०१८ साली आंध जमातीचा प्राचीन वांशिक व राजकीय इतिहास हा ग्रंथ लिहीला त्यामध्ये आंध हे प्राचीन काळी सातवाहन घराण्याशी संबंधित होते तसेच आंध ही प्राचीन जमात असुन ते सातवाहनांचे उत्तराधिकारी होते असे म्हटले. तसेच या ग्रंथात आदिवासी संत व पुढील काळात राजवटीत आंध जमातीतील क्रांतीकारकांनी दिलेल्या योगदानाच्या अभ्यास या ग्रंथात करण्यात आलेला आहे.

वरील साहित्यामध्ये आंध जमातीवर संशोधन केल्याचे दिसते त्यामध्ये त्यांचे सामाजिक सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकलेला दिसतो. परंतु अलिकडील काळात आंध जमातीच्या सामाजिक, सांस्कृतीक व आर्थिक क्षेत्रात किती प्रमाणात परिवर्तन घडून आले आहे, त्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. म्हणुन मी यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमात एवढाच मर्यादित विषय घेवून त्यांच्यातील परिवर्तनाच्या संदर्भात अभ्यास करणार आहे. जो अजुन पर्यंत अभ्यासला गेला नाही.

प्रकरण आराखडा :-

प्रकरण पहिले: प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरण पुढील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करण्यात येईल.

१.१ आदिवासी जमातीची व्याख्या व संकल्पना

१.२ आदिवासी समाजाचे वर्गीकरण त्याची वैशिष्ट्ये

१.३ संशोधन विषयाची निवड व संशोधनाची व्याप्ती

१.४ उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पध्दती

१.५ पुर्व संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण दुसरे : यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी जमातीचा ऐतिहासकी आढावा

प्रस्तुत प्रकरण पुढील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करण्यात येईल.

२.१ यवतमाळ जिल्ह्याचा इतिहास

२.२ यवतमाळ जिल्ह्याची भौगोलिक वैशिष्ट्ये

२.३ यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी जमातीचा आढावा

प्रकरण तिसरे : यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमातींचा इतिहास

प्रस्तुत प्रकरण पुढील मुद्याच्या आधारे स्पष्ट करण्यात येईल.

३.१ यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमातीची माहिती

३.२ आंध जमातीची सामाजिक स्थिती

३.३ आंध जमातीची सांस्कृतिक स्थिती

३.४ आंध जमातीची आर्थिक स्थिती

प्रकरण चौथे : आदिवासी जमातीसाठी केलेल्या घटनात्मक व शासकीय तरतुदी

प्रस्तुत प्रकरण पुढील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करण्यात येईल.

४.१ आदिवासी समाजासाठी भारतीय राज्यघटनेत करण्यात आलेल्या तरतुदी व कायदे

४.२ भारत सरकारच्या आदिवासी साठींच्या शासकीय योजना व धोरणे

प्रकरण पाचवे : आंध जमातीच्या परिवर्तनाच्या दिशा

प्रस्तुत प्रकरण पुढील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करण्यात येईल.

५.१ यवतमाळ जिल्ह्यात आदिवासींसाठी राबविण्यात आलेल्या शासकीय योजना

५.२ आंध जमातीतील सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन

५.३ आंध जमातीतील शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रातील परिवर्तन

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील आंध जमातीच्या परिवर्तनाच्या संदर्भात मांडलेल्या उद्दिष्टांची व गृहितकृत्यांची पडताळणी करण्यात येऊन वरील पाच प्रकरणाचा सारांश रुपाने आढावा घेऊन त्यांच्या आधारे निघालेल्या विश्लेषणातुन निष्कर्ष मांडण्यात येतील व शिफारशी सुचविण्यात येतील.

संदर्भ ग्रंथ सुची :-

१. घाटोळे रा.ना.: समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, सातवी आवृत्ती २०००

२. काचोळे दा.धो.: सामाजिक संशोधन पध्दती, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, १९९३

३. भांडारकर पु.ल.: सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, १९७६

४. डॉ.गारे,गोविंद पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध आदीवासी , श्री विद्या प्रकाशन २५० शनिवार पेठ, पुणे प्रकाशन २००१

५. डॉ.फडके सुधिर, महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, टिळक रस्ता पुणे, प्रथम आवृत्ती १९६३

६. डॉ.गारे गोविंद, भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, अमृत प्रकाशन, अ -३६ एम.आय.डी.सी स्टेशन रोड औरंगाबाद, व्दितीय आवृत्ती १९६३

७. डॉ.गारे, गोविद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन विजय नगर पुणे, व्दितीय आवृत्ती २०२२

८. डॉ.चवरे रा.गो.: आंध जमात : साहित्य आणि संस्कृती, मराठी जन साहित्य परिषद जन साहित्य भवन, गणेश कॉलनी, अमरावती २०१०

९. प्रा.डॉ.धनजकर राजेश : मराठवाड्यातील आंध जमातीचे लोक साहित्य, अनुराधा पब्लिकेशन सिडको, नांदेड, २०१३

१०. भिसे तुकाराम : आंध जमातीचा प्राचीन वांशिक व राजकीय इतिहास, निर्मला प्रकाशन नांदेड, २०१८

११. ट्राईब्ज ऑफ महाराष्ट्र : डिपार्टमेंट ऑफ ट्रायबल डेव्हलपमेंट, ट्रायबल रिसर्च ॲन्ड ट्रेनिंग इस्टिट्युट पुणे गर्व्हमेंट ऑफ महाराष्ट्र १९८०.

१२. हेस्टिंग्ज वॉरेन : आंध सेंन्सेस ऑफ इंडिया १८९१ व्हॅल्युम ६ बेरॉर ऑफ हैद्राबाद असाइन्ड डिस्ट्रिक्ट, कलकत्ता

१३. नियतकालिके - दै.लोकसत्ता, दै.लोकमत, दै.सकाळ, दै.महाराष्ट्र टाईम्स, लोकराज्य

१४.	विविध वेबसाईटस

संशोधक विद्यार्थी

प्रा.देविदास नागोराव रिठे
श्री.शिवाजी महाविद्यालय, परभणी

मार्गदर्शक

प्रो.डॉ.पी.ए.सुतवणे
इतिहास विभाग प्रमुख
श्री.शिवाजी महाविद्यालय, परभणी